
दुसऱ्या



मधु-प्रशिक्षण

# मधमाशी पालनासाठी विविध शासकीय योजना

मधमाशी पालनाबद्दल मोठ्या प्रमाणात जनजागृती होत आहे. त्यामुळे अनेकांना मधमाशी पालनाबद्दलची माहिती घेऊन आपल्या व्यवसायाची सुरुवात करण्याची इच्छा आहे. खरं तर मागील दोन- तीन वर्षांपासून भारत सरकारनेही मधमाशी पालनासाठी चांगल्या प्रकारची आर्थिक तरतूद केली आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी 'आत्मनिर्भर भारत' या योजनेंतर्गत मधमाशी पालनासाठी ५०० कोटींचे आर्थिक पॅकेज जाहीर केले आहे. यामुळेही मधमाशी पालनाला एकप्रकारची उभारी येईल असे वाटते. अर्थात, या ५०० कोटी रुपयांच्या पॅकेजच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना आजपावेतो तयार होऊन उपलब्ध झालेल्या नाहीत. परंतु यापूर्वी भारत सरकार तसेच महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांमार्फत मधमाशी पालनासाठी योजना सुरू झालेल्या आहेतच. विशेषत: 'आत्मा'- कृषी विभाग, खादी- ग्रामोद्योग विभाग यांच्या माध्यमातून मधमाशी पालनाला प्रोत्साहन देऊन विविध योजना राबविण्यात येतात.

तांत्रिक ज्ञान आवश्यक : मधमाशी पालन हा विषय साधा- सोपा वाटत असला तरी त्यामध्ये अनेक तांत्रिक बाबी आहेत. म्हणून मधमाशी पालनाला सुरुवात करण्यापूर्वी त्याचे ज्ञान आणि तंत्रज्ञान समजावून घेण्यासाठी सविस्तर प्रशिक्षण घेण्याची गरज आहे. मधमाशी पालन, मध उत्पादन, परागीभवनाच्या सेवा देणे तसेच मधमाश्यांच्या वसाहती तयार करून त्याद्वारे उत्पादकांना मध उपलब्ध करून देणे, मध उत्पादनानंतर त्यावर प्रक्रिया आणि विक्री व्यवस्था, मधमाशी पालनापासून विविध पदार्थांचे उत्पादन घेणे यासारख्या अनेक तांत्रिक बाबी आणि उद्योगातून हा विषय पुढे घेऊन जाता येतो. यासाठी शासनाच्या विविध योजना आहेत.

प्रशिक्षण कार्यक्रम : भारत सरकारच्या कृषी मंत्रालयांतर्गत नॅशनल बी बोर्डाची स्थापना केली आहे. या संस्थेच्या माध्यमातून राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, कृषी विभाग- 'आत्मा' तसेच कृषी विद्यापीठांच्या माध्यमातून मधमाशी पालन या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. राष्ट्रीय मधुमक्षिका संशोधन व प्रशिक्षण संस्था- खादी व ग्रामोद्योग विभाग यांच्या माध्यमातूनही प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. खासगी संस्था उदा. बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्र, पिंपळगाव बसवंत (नाशिक) यांसारख्या इतर संस्थांच्या माध्यमातूनही प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येतात. राज्यातील काही कृषी विभाग केंद्रांमध्येही प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात. प्रशिक्षणाचा कालावधी एक दिवसापासून ते एक महिन्यापर्यंतचा असतो. प्रशिक्षणातून आपणास कोणती माहिती घ्यावयाची आहे याचा विचार करून प्रशिक्षणाचा कालावधी निवडता येईल. मधमाशी पालन करत असताना त्या अनुषंगाने उपलब्ध असलेल्या विविध योजनांचा लाभ घ्यावयाचा असेल तर तांत्रिक प्रशिक्षण घेणे अत्यंत गरजेचे आहे. प्रशिक्षण न घेता मधमाशी पालन सुरू केले तर माहितीच्या अभावामुळे या व्यवसायामध्ये अपयश येते. म्हणूनच या व्यवसायाकडे वळत असताना तसेच आपल्या शेतात मधमाश्यांचा परागीभवनासाठी वापर करत असताना प्रशिक्षण घेऊनच सुरुवात करावी.

मधमाश्यांच्या वसाहती तयार करणे : मधमाशी पालनासाठी सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे मधमाश्यांच्या चांगल्या जाती, त्यांच्या चांगल्या वसाहती योग्य ठिकाणी उपलब्ध होणे. यावरच मधमाशी पालनाचे यश अवलंबून आहे. मधमाश्यांच्या मूलभूत चांगल्या प्रकारच्या वसाहती तयार करण्याचे काम शासकीय यंत्रणेकडे असून याकरिता २० लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य करण्यात येते. अशा प्रकारच्या तयार झालेल्या मूलभूत वसाहती मधपालकांना त्यांच्याकडे वसाहती वाढविण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येतात. ज्यांना वसाहतींची संख्या वाढवून विक्रीसाठी उपलब्ध करून द्यावयाच्या आहेत अशांना मधमाशी पालनासाठी १० लाख रुपयांपर्यंतचे अर्थसहाय्य आणि ४० टक्के अनुदान देण्याचे प्रावधान करण्यात आलेले आहे. ज्यांना या योजनेमध्ये भाग घ्यावयाचा आहे त्यांनी या मिळालेल्या अर्थसहाय्य आणि अनुदानातून वर्षाला कमीत कमी २००० मधमाश्यांच्या वसाहती तयार करून मधमाशी पालकांना उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. मध उत्पादन तसेच परागीभवनाची सेवा देणाऱ्या मधमाशी पालकांना मोठ्या प्रमाणात मधमाश्यांच्या वसाहतींची गरज असते. त्यामुळे हा व्यवसाय सुरू करून चांगला आर्थिक फायदा मिळू शकतो.

मधमाशी पालन व्यवसाय : ज्यांना मधमाशी पालन व्यवसाय सुरू करून मध आणि इतर तत्सम पदार्थांचे उत्पादन तसेच

परागीभवनाची सेवा द्यावयाची आहे, त्यांच्यासाठी शासनाच्या माध्यमातून योजना राबविण्यात येते. मधमाशी पालनासाठी मधमाशीच्या पेट्यांची आवश्यकता असते. मधमाशी पालन व्यवसाय आर्थिकदृष्ट्या किफायतशीर होण्यासाठी कमीत कमी ५० पेट्यांपासून सुरुवात करावी. एक पेटी रु. २००० या प्रमाणे ५० पेट्यांसाठी एक लाख रुपये तसेच मधमाश्यांच्या वसाहती रु. २००० प्रतिवसाहत याप्रमाणे ५० मधमाश्यांच्या वसाहतींसाठी एक लाख रुपये अशाप्रकारे दोन लाख रुपयांपर्यंतचे आर्थिक सहाय्य मिळते. मधमाश्यांच्या पेट्या आणि वसाहती घेतल्यानंतर व्यवसाय सुरू करण्यासाठी लागणारे मध काढणी यंत्र तसेच इतर साहित्य यासाठी अंदाजे २०,००० रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्यही या योजनेमध्ये उपलब्ध आहे. म्हणजेच ज्यांना मधमाशी पालन व्यवसायाची सुरुवात ५० पेट्या आणि वसाहतीपासून करावयाची आहे त्यांना रु. २.४० लाख रुपयांपर्यंत आर्थिक सहाय्य आणि त्यावर ४० टक्के अनुदान या प्रकारची  योजना उपलब्ध आहे. या योजनेमध्ये ज्यांना सहभागी व्हायचे आहे त्यांचे वय कमीत कमी १८ वर्षे असावे. हा व्यवसाय कमीत कमी तीन वर्षे करणे आवश्यक आहे. तरच त्यांना अनुदानाचा लाभ घेता येतो. या योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी मधमाशी पालनाचे प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे.

मध उत्पादन, प्रक्रिया आणि विक्री : पंतप्रधान तसेच मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत मध उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक अशा सर्व सुविधांची निर्मिती करण्यासाठी १ लाखापासून २५ लाखांपर्यंतचे कर्ज उपलब्ध होते. या प्रकल्पांर्गत मध प्रक्रिया आणि विक्री व्यवस्थेसाठी आवश्यक अशा सर्व मशिनरी आणि साहित्याची खरेदी करता येते. ज्यांनी या विषयाचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे त्यांना या योजनेमध्ये सहभागी होता येते. प्रकल्प सुरू करण्यासाठी स्वभांडवल १० टक्के असणे गरजेचे आहे. यामध्ये २५ टक्के अनुदान (एससी, एसटी, ओबीसी, महिला  यांना ३५ टक्के अनुदान) आणि उर्वरित ६५ टक्के रक्कम राष्ट्रीयीकृत बँकेकडून कर्ज स्वरुपात मिळते. यासाठी प्रकल्प आराखडा तयार करून या योजनेसाठी राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाकडे अर्ज करता येतो.

कृषी विभागाकडील योजना : राष्ट्रीय फलोत्पादन योजनेंतर्गत ५० टक्के अनुदानावर आधारित योजना असून एका शेतकऱ्याला ५० पेट्यांपर्यंत मधपेट्या तसेच साहित्य दिले जाते. तसेच 'आत्मा प्रकल्पां'तर्गतही १ ते ५ दिवसांचे प्रशिक्षण देऊन एक पेटी आणि वसाहत खरेदी करण्यासाठी ४००० रुपये अनुदान दिले जाते. 'नानासाहेब कृषी संजीवनी योजना' (पोकरा) हा प्रकल्प राज्यातील १५ जिल्ह्यांतील काही गावांमध्ये राबविला जातो. या प्रकल्पामध्ये निवडलेल्या शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते. तसेच ५० मधमाश्यांच्या पेट्या तसेच वसाहती आणि मधमाश्यांचे संगोपन करताना आवश्यक असलेल्या साहित्याच्या खरेदीसाठी एकूण उत्पन्नाच्या ५० टक्के अनुदान दिले जाते.

या योजनेबरोबरच महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागामार्फत क्लस्टर विकास योजनेंतर्गत मधमाशी पालनाला प्रोत्साहन देण्यात येते. या योजनेमध्ये कमीत कमी २० तर जास्तीत जास्त १०० लाभार्थी असणे गरजेचे आहे. या योजनेमध्ये १० ते २० टक्के रकमेपर्यंतचे भांडवल लाभार्थीने द्यावयाचे आहे तर उर्वरित भांडवलाची उपलब्धता प्रकल्पामधून करण्यात येते. आग्या मोहळापासून चांगल्या दर्जाचे मध उत्पादन घेत असताना त्या मोहळाच्या वसाहती नष्ट होणार नाहीत या प्रकारे काळजी घेण्यासाठी विशेष उपक्रम जिल्हा मानव विकास कार्यक्रमामध्ये राबविला जातो. यासाठी आदिवासी समाजातील तरुणांना पाच दिवसांचे विनाशुल्क प्रशिक्षण दिले जाते. तसेच प्रशिक्षणानंतर हा व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या साहित्याचे कीट शंभर टक्के अनुदानाच्या स्वरुपात दिले जाते. यामुळे आदिवासी समाजाला रोजगार मिळतो तसेच आग्यामोहळाचे संरक्षण होऊन मधउत्पादन मिळते. ही योजना वनविभागाच्या माध्यमातूनही राबविली जाते. कृषी विभाग– 'आत्मा', राष्ट्रीय फलोत्पादन प्रकल्प, खादी आणि ग्रामोद्योग विभाग, राष्ट्रीय मधुमक्षिका संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र याबरोबरच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा उद्योग केंद्र, वन विभाग, महिला आर्थिक विकास मंडळ तसेच जिल्हा पातळीवरील जिल्हा वार्षिक योजना या सर्व विभागांतून विविध कार्यक्रमांतर्गत मधमाशी पालनाला प्रोत्साहन तसेच अनुदान देण्यात येते.

'हनी मिशन' अंतर्गत मधमाशी पालन, वसाहत विभाजन, राणी माशी तयार करणे, मध प्रक्रिया, तपासणी आणि विक्री आणि मधाबरोबरच मधमाशी पालनासह विविध पदार्थांची निर्मिती या सर्व विषयांवर प्रशिक्षण देण्याची सुविधा निर्माण केलेली आहे. खरं तर हे सर्व असताना मधमाशी पालन व्यवसाय महाराष्ट्रामध्ये पुढे का जात नाही तर त्याला मुख्य कारण म्हणजे या क्षेत्रात असलेला मनुष्यबळाचा तुटवडा! म्हणूनच या व्यवसायामध्ये आजच्या तरुणांनी पुढाकार घेतला तर या व्यवसायातून मोठ्या प्रमाणात अर्थार्जन होऊ शकेल. तसेच मानवी आरोग्याला उपयुक्त अशा मधमाशीपासून मिळणाऱ्या विविध पदार्थांची उपलब्धता वाढेल. याचबरोबर शेती उत्पादनातही वाढ होईल.

नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंत, ता. निफाड येथे 'ग्रीनझोन ॲग्रोकेम'च्या माध्यमातून बसवंत मधमाशी उद्यान आणि प्रशिक्षण केंद्राची सुरुवात केली आहे. या विषयाचे प्रशिक्षण घेण्यासाठी तसेच सविस्तर माहितीसाठी इच्छुकांनी श्री. नितीन कराळे, प्रकल्प व्यवस्थापक (७७७४०८९५१७) किंवा श्री. शरद शेवाळे, प्रकल्प सहायक (९९२२४१०८७२) यांच्याशी अवश्य संपर्क करावा.

**(सौजन्य : 'पूर्वा कृषिदूत' परिवार)** ■